कार्यालय, शिक्षण विभाग (प्राथ.) जिल्हा परिषद, नागपूर, सिव्हिल लाईन, नागपुर
-: नमुना-दोन

5973

ग्राम : नागपूर शहर
दूरध्वनी : ०७१२-२५६०९०२
ई मेल : eonagpur1@yahoo.com.in
फॅक्स : ०७१२-२५६०९०३

जावक क्र.जि.प.ना.प्रा/[illegible]/शा.मा./का.क्र.२५७/ /२०२५
कार्यालय:जिल्हा शिक्षणाधिकारी (प्राथ.)जिल्हा परिषद नागपूर
जिल्हा: नागपूर, राज्य महाराष्ट्र
दिनांक: 26/06/२०२५

प्रति,

अध्यक्ष/ सचिव
ड्रिमलाईन एज्युकेशन सोसायटी,
सावनेर, नागपूर.

विषय: बालकांचा मोफत व सक्तीचा शिक्षणाचा हक्क अधिनियम २००९ यांच्या कलम १८ च्या प्रयोजनार्थ बालकांना मोफत व सक्तीचा शिक्षणाचा हक्क नियम २०११ यांच्या नियम ११ पोट नियम (४) अन्वयक शाळांना मान्यता प्रमाणपत्र देण्याबाबत.

उपरोक्त विषयान्वये आपल्या २३/०५/२०२५ च्या अर्जाच्या संदर्भात आणि त्यानंतर या संदर्भात शाळेशी झालेला पत्रव्यवहार/शाळेची केलेली तपासणी याआधारे **मी निर्धोल भयार शिक्षणाधिकारी (प्राथ.) जिल्हा परिषद नागपूर दिनांक ०१.०४.२०२५ पासून दिनांक ३१.०३.२०२८** पर्यंत तीन वर्षांच्या कालावधीसाठी इयत्ता १ ते ८ वी करीता रॉयल इंटरनॅशनल स्कूल,गुजरखेडी,ता.सावनेर, नागपूर.(माध्यम-इंग्रजी) शाळेस तात्पुरती मान्यता देत आहे.

वरील मान्यता ही खालील शर्तीच्या पूर्ततेच्या अधीन आहे.

१) मान्यतेचा कालावधी वाढवून मिळणार नाही आणि इयत्ता आठवीनंतर मान्यता किंवा संलग्नता देण्यास कोणत्याही परिस्थितीत कोणतेही बंधन नसेल.

२) बालकांना मोफत व सक्तीच्या शिक्षणाचा हक्क अधिनियम २००९ (जोडपत्र एक) आणि महाराष्ट्र बालकांचा मोफत व सक्तीच्या शिक्षणाचा हक्क नियम २०११ (जोडपत्र दोन) मधील तरतुदींचे शाळा पालन करील.

३) शाळा समाजाच्या दुर्बल घटकातील आणि वंचित गटातील बालकांना, पहिल्या इयत्तेत त्या इयत्तेतील विद्यार्थी संख्येच्या किमान २५ टक्के मर्यादेपर्यंत प्रवेश देईल आणि प्राथमिक शिक्षण पूर्ण होईपर्यंत त्यांना मोफत व सक्तीचे शिक्षण देईल परंतु आणखी असे की, पूर्व प्राथमिक इयत्तेच्या बाबतीत देखील या प्रमाणकाचे अनुपालन करण्यात येईल.

४) परिच्छेद ३ मध्ये निर्दिष्ट केलेल्या बालकांकरीता शाळेला अधिनियमाच्या कलम १२(२) नुसार प्रतिपूर्ती मिळेल अशी प्रतिपूर्ती मिळण्यासाठी शाळेला स्वतंत्र बँक खाते ठेवण्यात येईल.

५) संस्था/ शाळा कोणतीही कॅपिटेशन फी वसूल करणार नाही आणि कोणत्याही छाननी पध्दतीसाठी बालकास किंवा त्याच्या माता - पित्यास किंवा पालकांकांना भाग पाडणार नाही.

६) कोणत्याही बालकास वयाच्या पुराव्याच्या अभावी धर्म जात किंवा वंश जन्मठिकाण किंवा यापैकी कोणत्याही कारणास्तव, शाळेमध्ये प्रवेश नाकारण्यात येणार नाही.

७) (१) शाळेत प्रवेश दिलेल्या कोणत्याही बालकास तो ज्या इयत्तेत असेल त्याच इयत्तेत रोखून ठेवले जाणार नाही किंवा प्राथमिक शिक्षण पूर्ण होईपर्यंत शाळेतून काढून टाकण्यास येणार नाही.

(२) कोणत्याही बालकास शारीरिक शिक्षा किंवा मानसिक त्रास देण्यात येणार नाही.

(३) कोणत्याही बालकास प्राथमिक शिक्षण पूर्ण होईपर्यंत कोणत्याही मंडळाची परीक्षा उत्तीर्ण होणे आवश्यक असणार नाही.

(४) प्राथमिक शिक्षण पूर्ण केलेल्या प्रत्येक बालकास नियम २२ अन्वये निर्धारित केलेले प्रमाणपत्र देण्यात येईल.

(५) विकलांग/विशेष गरजा असलेल्या विद्यार्थ्यांच्या अधिनियमाच्या तरतुदीनुसार समावेश करण्यात येईल.

(६) अधिनियमाच्या कलम २३(१) अन्वये निर्धारित केलेली किमान अर्हता धारण करणा-या शिक्षकांची नियुक्ती करण्यात येईल परंतु आणखी असे की अधिनियमाच्या प्रारंभाच्या दिनांकास किमान अर्हता धारण करणा-या शिक्षकांना अशी किमान अर्हता ५ वर्षाच्या कालावधीत संपादित करावी लागेल.

(७) अधिनियमाच्या कलम २४ (१) मध्ये विनिर्दिष्ट केलेली त्याची/तिची कर्तव्ये शिक्षक पार पाडतील.

(८) शिक्षकांने/ शिक्षिकाने खाजगी शिकवणीच्या कामात स्वतःला गुतवून घेऊ नये याची सुनिश्चिती शाळा करील.

PRINCIPAL
ROYAL INTERNATIONAL
SCHOOL, SAONER

MANAGER
Royal International
School, Saoner

८) शाळा समुचित प्राधिकरणाने निर्धारित केलेल्या अभ्यासक्रमाच्या आधारे तयार केलेल्या पाठ्यक्रमाचे पालन करील.

९) शाळा अधिनियमाच्या कलम १९ मध्ये विहित केल्याप्रमाणे शाळेत उपलब्ध असलेल्या सुविधांच्या तुलनेत विद्यार्थ्यांना प्रवेश देईल.

१०) शाळा अधिनियमाच्या कलम १९ मध्ये विनिर्दिष्ट केलेल्या मानकांचे व प्रमाणकांचे पालन करील शासन तपासणीच्या वेळी शाळेत उपलब्ध असलेल्या सुविधा खालीलप्रमाणे होत्या.

१. शाळेचा परिसर — २.७५ एकर

२. एकूण बांधकाम — ११००० चौ.फु.

३. खेळाच्या मैदानाचे क्षेत्रफळ — ४४००० चौ.फु.

४. शाळेतील एकूण खोल्यांची संख्या — १५ वर्ग खोल्यांची संख्या - ०८

५. कार्यालय नि भांडार नि मुख्याध्यापकांची खोली — आहे.

६. मुलांसाठी व मुलींसाठी स्वतंत्र प्रसाधनगृह होय — आहे.

पाणी पिण्यासाठी व प्रसाधनगृह स्वच्छ आणि आरोग्यदायी,

स्वच्छतेसाठी पुरेसे पाणी असेल. — आहे

७. पिण्याच्या पाण्याची सुविधा — आहे(नळ.)

८. दुपारचे जेवन शिजविण्यासाठी स्वयंपाकघर :- आहे

९. अध्यापन-अध्ययन साहित्य/खेळ व क्रिडाविषयक साहित्य/ग्रंथालय यांची उपलब्धता :- आहे(क्रि.बॅडमिंटन रॅकेट,)

१० वाचन साहित्य ग्रंथालयात उपलब्ध (पुस्तकांची संख्या [illegible] आहे)

११. सर्व सुविधा किंवा अडथळा उपलब्ध आहेत काय? - होय

१२. शाळेला संरक्षण भिंत आहे काय, — आहे

११) मान्यता नसलेले वर्ग किंवा तुकड्या शाळेच्या परिसरात किंवा इतरत्र चालविता येणार नाहीत.

१२) शाळेची इमारत किंवा इतर बांधकाम किंवा क्रिडांगण हे केवळ शिक्षणाच्या व कौशल्य विकासाच्या प्रयोजनार्थ वापरण्यात येतील.

१३) शाळा संस्था नोंदणी अधिनियम १८६०(१८६० चा २१) किंवा मुंबई सार्वजनिक विश्वस्त व्यवस्था अधिनियम १९५० अन्वये नोंदणी झालेल्या संस्थेमार्फत चालविण्यात येत आहे.

१४) शाळा कोणत्याही व्यक्तीच्या गटाच्या किंवा व्यक्तीसंघाच्या किंवा इतर कोणत्याही व्यक्तींच्या फायद्याकरीता किंवा कोणत्याही नफा मिळवण्यासाठी चालविण्यात येत नाही.

१५) शाळेचे लेखे सनदी लेखापालाकडून लेखापरिक्षित व प्रमाणित करून घ्यावेत आणि नियमानुसार योग्य लेखा विवरण पत्र तयार करावेत. प्रत्येक लेखा विवरण पत्राची एक प्रत दरवर्षी जिल्हा शिक्षणाधिकारी यांच्याकडे पाठविण्यात यावी.

१६) तुमच्या शाळेला मिळालेला मान्यता सांकेतांक २७०९०४०६५०४ असा आहे हा या कार्यालयाशी कोणत्याही पत्रव्यवहार करताना कृपया नोंदवून करावा याची नोंद घ्यावी.

१७) शिक्षण संचालक/जिल्हा शिक्षणाधिकारी वेळोवेळी मागणी करतील असे अहवाल व माहिती शाळेने सादर करावी किंवा शाळेच्या मान्यतेच्या शर्तीची निरंतर पूर्तता करण्यासाठी किंवा शाळेच्या कामकाजातील त्रुटी दूर करण्यासाठी शासन किंवा स्थानिक प्राधिकरण देईल अशा सूचनांचे पालन करावे.

१८) संस्थेच्या नोंदणीचे कोणतेही नुतनीकरण असल्यास नुतनीकरण केल्याची सुनिश्चित करावी.

१९) जोडपत्र तीन नुसार इतर शर्ती वरीलप्रमाणे जोडल्या आहेत.

२०) बालकांच्या मोफत व सक्तीच्या शिक्षणाचा हक्क अधिनियम २००९ प्रमाणे शाळेला आवश्यक असणाऱ्या

**उपरोक्त त्रुटींची पुर्तता दिनांक ३१.३.२०२८ पर्यंत पूर्ण करण्यात याव्यात अन्यथा आपल्या शाळेची मान्यता त्यापुढे आपोआप संपुष्टात येईल.**

(सिद्धेश्वर काळुसे)
शिक्षणाधिकारी (प्राथमिक)
जिल्हा परिषद नागपूर

प्रतिलीपी :-

मुख्याध्यापक, रॉयल इंटरनॅशनल स्कूल,गुजरखेडी,ता.सावनेर, नागपूर.यांना माहितीस अग्रपित.

शिक्षणाधिकारी (प्राथमिक)
जिल्हा परिषद नागपूर

PRINCIPAL
ROYAL INTERNATIONAL
SCHOOL, SAONER

MANAGER
Royal International
School, Saoner